
खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १४३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०५ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मुख्यमंत्री फडणवीसांकडून ठाकरे बंधूंच्या वचननाम्याची चिरफाड !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीचं बिगूल वाजलं आहे, प्रचाराला देखील वेग आला आहे, दरम्यान आज शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या युतीनं आपला वचननामा जाहीर केला. या वचननाम्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर जोरदार टीका केली आहे.

त्यांनी अमित ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यावर देखील निशाणा साधला. ते कांदिवलीमध्ये आयोजित सभेत बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी उद्धव ठाकरे यांचा उल्लेख मामू असा केला. आमचे मामू उद्धोजी आणि नव्यानेच पुन्हा एकदा प्रेम उफाळलेले राजजी यांनी या ठिकाणी एक वचननामा जाहीर केला. पहिल्यांदा तर मी एकच सांगू इच्छितो, वचननामा देण्याचा अधिकार हा फक्त बाळासाहेब ठाकरे यांना होता, असा हल्लाबोल यावेळी फडणवीस यांनी केला आहे.

**“ नेमकं काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?**

आज जाहीर झालेला वचननामा नाही. तो वाचून नामा आहे. पण त्यांनी काय वाचलं हे त्यांनाही माहिती नाही. याच कारण आपण बघाल, एका वाहिनीने २०१७ सालच्या यांच्या आश्वासनासंदर्भातील एक फॅक्ट चेक केला, आणि त्या फॅक्ट चेकमध्ये असं दिसलं की यांनी त्यावेळी जे पाच वचनं दिले होते, त्यातील एकही वचन यांना पूर्ण करता आलं नाही. मला आश्चर्य वाटतं जर आपल्याला खोटचं



## मुंबईत केली तुफान फटकेबाजी...

बोलायचं आहे तर तो वचननामा आईच्या चरणी कशाला ठेवायचा? मला असं कळलं की हे जेव्हा वचन नामा करायला बसले, तेव्हा ते आपापसात काही तरी बोलत होते. मग मी त्याची माहिती काढली तर ते त्या ठिकाणी काय बोलत असतील? ‘झुटोने –झुटोसे का सच बोलो, अरे भाई दो भाईओ का ऐलान हुआ सच बोलो. घर के अंदर झुटो की एक मंडी है, दरवाजे पर लिखा है सच बोलो’ अशी शेरोशायरी करत फडणवीस यांनी जोरदार टोलेबाजी केली.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे आणि मनसे नेते अमित ठाकरे यांचं नाव न घेता त्यांच्यावर देखील निशाणा साधला. आता बघा ते दोन युवराज त्या ठिकाणी कुठला तरी शो करत होते. राहुल गांधींसारखी स्क्रिन लावली होती, राहुल गांधी सारख्या येरझऱ्या करत होते, काही तरी बोलत होते, आणि मला कोणीतरी सांगितलं की त्यांनी असं म्हटलं, मुंबईमध्ये चांगल्या प्रकारचे शौचालय देखील नाहीत. आता हे आम्हाला का विचारता, घरी जाऊन काकांना किंवा बाबांना विचारा. २५ वर्षांमध्ये मुंबईत शौचालय देखील का तयार झाले नाहीत? याचं उत्तर आम्ही द्यायचं, की बाबा आणि काकांनी द्यायचं? मात्र तुम्ही या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घ्या आज जो वचननामा आला आहे, त्यात वचनही नाहीये आणि नामाही नाहीये. मला कोणीतरी म्हणालं कार्टूननिस्ट आणि कॅमेरामनची युती झाली, मी म्हणालो असं म्हणणं योग्य नाही. मग मला कोणी तरी असं म्हटलं की, कॅमेडियन आणि कॅमेरामनची युती झाली, मी त्यांना म्हटलं हे देखील योग्य नाही. कारण कोणाचा व्यावसाय काहीही असू शकतो, ही जी युती झाली आहे ती युती करप्शन आणि कन्फ्यूजची झाली आहे, अशा शब्दात फडणवीस यांनी हल्लाबोल केला आहे.

# विकासकामांच्या जोरावर चंद्रपूर महानगरपालिकेत महायुतीचा झेंडा फडकेल : मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :**

चंद्रपूर येथे भारतीय जनता पार्टीच्या सत्तेत विविध विकासकामे झाली असून शहराचा चेहरा-मोहरा बदलण्याचे काम आम्ही केले आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या अनेक जनउपयोगी योजना आम्ही येथे यशस्वीपणे राबवित आहोत. आता १६ हजार घरांना कायमस्वरूपी पट्टे देण्याचा निर्णय झाला असून त्याची प्रक्रियाही सुरू झाली आहे.

आजच्या या विजय संकल्प यात्रेतून विजयाचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. आम्ही केलेल्या विकासकामांच्या जोरावर आणि माता महाकालीच्या दर्शनाने चंद्रपूर महानगरपालिकेत म हाविजय मिळणार असून येथे महायुतीचा झेंडा फडकेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. चंद्रपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत महायुतीतील सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य विजय संकल्प यात्रा काढण्यात आली. अंचलेश्वर गेट येथून निघालेल्या संकल्प यात्रेचा जटपूरा गेट येथे समारोप करण्यात आला. येथे कार्यकर्त्यांना संबोधित करताना ते




बोलत होते.

यावेळी चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. प्रा. अशोक उईके, राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, भाजप नेते आ. सुधीर मुनगंटीवार, आ. किशोर जोरगेवार, आ. कीर्तिकुमार भांगडिया, आ. देवराव भोंगळे, आ. करण देवतळे, शिवसेनेचे पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव, जिल्हाप्रमुख ॲड. युवराज धानोरकर आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विकासाच्या मुद्द्यावर भारतीय जनता पार्टी निवडणुकीला सामोरे जात आहे. चंद्रपूर शहरात मागील काही काळात हंसराज अहिर, सुधीर मुनगंटीवार आणि किशोर जोरगेवार यांच्या नेतृत्वात विकास झाला आहे. चंद्रपूरची आराध्य दैवत माता महाकाली आणि पवित्र दीक्षाभूमीच्या विकासासाठी मोठा निधी आपण मंजूर केला आहे. पिण्याच्या पाण्याची योजना, भुयारी गटार योजना, रस्ते योजना, सुशोभीकरण योजना, प्रधानमंत्री आवास योजना अशा अनेक योजनांच्या माध्यमातून आपण या शहराचा सर्वसमावेशक विकास केला आहे. पुढेही ही विकासाची गाडी याच गतीने सुरू ठेवण्यासाठी चंद्रपूर महानगरपालिकेत पारदर्शक सत्ता असणे गरजेचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शहराच्या विकासासाठी ५० हजार कोटी रुपये देणार असल्याची घोषणा केली आहे. यात चंद्रपूर शहरालाही निधी देण्यात येणार आहे. त्यामुळे या निधीचा योग्यरीत्या वापर व्हावा यासाठी भाजपशिवाय पर्याय नाही. १५ तारखेला महायुतीच्या सर्व उमेदवारांना निवडून देत चंद्रपूरच्या विकासाला अधिक गतीशील करण्याचे आवाहन यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

**मुख्यमंत्री यांनी महाकालीचे दर्शन घेत फोडला प्रचाराचा नारळ**

राज्यभरात आजपासून सर्वच म हानगरपालिकांच्या निवडणूक प्रचाराला सुरुवात झाली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूरची आराध्य दैवत माता महाकालीचे दर्शन घेत भारतीय जनता पक्षाच्या प्रचाराचा नारळ फोडला आहे. विविध ठिकाणी यात्रेचे स्वागत अंचलेश्वर गेटजवळून निघालेल्या विजय संकल्प यात्रेचे विविध ठिकाणी स्वागत करण्यात आले.

# मध्यरात्री धारदार शस्त्राने हल्ला, तरुणाला गल्लीतल्या पोरांनी संपवलं...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, नाशिक :** नाशिकमध्ये हत्येची पुन्हा एक धक्कादायक घटना समोर आली आहे. काल शनिवारी रोजी रात्री उशिरा म्हसरूळ परिसरात एका तरुणाची हत्या झाल्याची घटना समोर आली



आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मयत रवी उशिले आणि संशयित ओम गवळी व संतोष गवळी यांच्यात किरकोळ वाद झाला होता. ज्याचे रूपांतर हाणामारीत झाले. यात धारदार शस्त्राने वार करत रवीची हत्या करण्यात आली आहे. ही संपूर्ण घटना परिसरात लावलेल्या CCTV मध्ये कैद झाली आहे.

**- नेमकी घटना काय?**

काल शनिवारी रात्री ११:३०च्या सुमारास तक्रारदार जेवणानंतर घराबाहेर वॉकिंग करत असताना त्यांच्या ओळखीच्या रवी उशिले यांच्याशी गप्पा मारत होते. त्याच गल्लीत राहणारे ओम गवळी आणि संतोष गवळी यांनी किरकोळ वादातून घटनास्थळी येऊन हा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांच्यासह सह.पोलीस आयुक्त शेखर देशमुख यांच्यासह पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्र फिरवत गुप्त बातमीदारार्फत मिळालेल्या माहितीनुसार विल्होळी येथील सीएनजी पेट्रोल पंपाच्या मागे लपून बसलेल्या संशयितांना ताब्यात घेतलं. या घटनेनंतर मयत रवी उशिले यांच्या कुटुंबीयांनी ओम गवळी आणि संतोष गवळी यांच्याविरुद्ध म्हसरूळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लव्ह जिहाद कसा थांबवणार?

सरसंघचालक मोहन भागवत यांनी लव्ह जिहाद थांबवण्यासाठी तीन महत्वपूर्ण उपाय सांगितले. त्यांनी यावेळी त्रिसूत्री सांगितली. कुटुंबात नियमित संवाद, मुलींमध्ये सजगता आणि आत्मसुरक्षेची भावना निर्माण करणे आणि लव्ह जिहादच्या जाळ्यात अडकवणाऱ्यांविरोधात कडक कायदेशीर कारवाईचा बडगा उगारणे या त्रिसूत्रींवर त्यांनी जोर दिला. सामाजिक संघटनांवर ही त्यांनी जबाबदारी निश्चित केली. अशा कोणत्याही घटनांबाबत सामाजिक संघटनांनी सजग राहावे. अशा घटनांविरोधात समाजाने एकत्रित येऊन विरोध करावा, तेव्हाच लव्ह जिहादवर सम ाधानकारक तोडगा निघेल याकडे त्यांनी लक्ष वेधले.

**महिलांमुळे धर्म आणि संस्कृती सुरक्षित**

जेव्हा समाज सभ्यतेचे गोडवे गातो. तेव्हा त्यात महिलांची भूमिका अत्यंत निर्णायक ठरते. आपला धर्म, आपली संस्कृती आणि



सामाजिक व्यवस्था महिलांमुळे सुरक्षित असल्याचे भागवत म्हणाले. पुरुष आणि महिला हे दोन्ही मिळून समाजाला पुढे नेतात. त्यामुळे दोघांनी सजग राहणे आणि जागरुक राहणे आवश्यक असल्याचे भागवत म्हणाले. पश्चिम समाजातील स्त्रीयांची स्थिती आणि भारतीय मातृत्व केंद्रीत समाज याची तुलना करत यामुळे भारतीय संस्कृती उंच स्थानी असल्याचे भागवत म्हणाले. यावेळी सरसंघचालकांनी लव्ह जिहादवर त्रिसूत्रीची माहिती देत त्याचा वापर करण्याचे समाजाला आवाहन केले.

# जामखेड हादरलं ! एकाच कापडी दोरीने बाप–लेकाने आयुष्य संपवलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, जामखेड :** जामखेड शहरात अंगावर शहारे आणणारी घटना समोर आली आहे. एकाच कापडी दोरीने बाप–लेकाने गळफास घेऊन आपल्या आयुष्याची अखेर केल्याने संपूर्ण शहर हादरले आहे. नव्या कोर्ट परिसरातील शेतात ही दुर्दैवी घटना उघडकीस आली असून, घटेनेने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

**✻ घरगुती तणाव आणि बाप-लेकात मोठा वाद...**

मयत बाप–लेकांची नावे कानिफ ज्ञानदेव पवार (वय ४५) आणि सचित कानिफ पवार (वय १६, देघेही रा. आरोळे वस्ती, जामखेड) अशी आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दोन–तीन दिवसांपूर्वी पत्नी माहेरी गेल्यानंतर घरात तणाव निर्माण झाला



होता. शुक्रवार, २ जानेवारी २०२६ रोजी रात्री घरगुती कारणावरून बाप–लेकांम ध्ये मोठा वाद झाला. त्यानंतर सचित घराबाहेर निघून गेला. वडिलांनी रात्रभर आणि पहाटेपर्यंत मुलाचा शोध घेतला; मात्र तो कुठेही सापडला नाही.

**✻ शेतात मुलगा झाडाला गळफास घेतलेला दिसला...**

पहाटे नवीन कोर्ट रोड म्हाडा कॉलनीजवळील शेतात झाडाला सचितने मॅटच्या कापडाने गळफास घेतल्याचे वडिलांच्या निदर्शनास आले. हा धक्का सहन न झाल्याने वडिलांनी मुलाचा मृतदेह खाली उतरवला आणि त्याच कापडाने स्वतःही गळफास घेऊन जीवन संपवले. ही घटना पाहून उपस्थितांच्या काळजात धस्स झाले.

या घटनेची माहिती समजतात नगरसेवक व पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. घटनेची माहिती मिळताच नगरसेवक महेश निमोणकर आणि संतोष गव्हाळे यांनी धाव घेतली. उपनिरीक्षक शिवाजी कदम आणि सचिन देवडे घटनास्थळी दाखल झाले. सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या मदतीने संजय कोठारी व दीपक भोरे यांनी रुग्णवाहिकेतून मृतदेह जामखेड ग्रामीण रुग्णालयात हलवले.

वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रकाश उमासे यांनी दोघांनाही मृत घोषित केले. या दोघांनी आपल्या आयुष्याची अखेर केली की त्यांचा घातपात झाला? या प्रश्नावर नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू असून, नेमकं कारण अद्याप अस्पष्ट आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# "राजा" होणार नगर सेवक! जनतेसाठी, जनतेसोबत!



ठाणे महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक ६ मधून युवा कार्यकर्ता प्रशांत उर्फ राजा जाधवर हे निवडणूक रिंगणात उतरले आहेत. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना पक्षाच्या माध्यमातून त्यांची महायुतीची उमेदवारी अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आली आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने त्यांच्या जीवनप्रवासाचा, सामाजिक कार्याचा आणि जनतेशी असलेल्या नात्याचा मागोवा घेणारा हा प्रासंगिक लेख.

या लेखास राजा होणार सेवक असे नाव मुद्दाम दिले आहे. कारण प्राचीन काळापासून राजा म्हणजे सत्ताधीश नव्हे, तर प्रजेचा सेवक असतो, हीच भारतीय राजकीय संस्कृती आहे. त्याच संस्कृतीचा आधुनिक प्रत्यय म्हणजे प्रशांत उर्फ राजा जाधवर. गेल्या अनेक वर्षांपासून प्रभाग क्रमांक ६ मध्ये समाजसेवक म्हणून कार्यरत असलेले राजा जाधवर आज जनतेच्या विश्वासाचे केंद्र बनले आहेत. त्यामुळे या सार्वत्रिक निवडणुकीत ते प्रचंड मताधिक्याने विजयी होऊन खऱ्या अर्थाने जनतेचे सेवक ठरणार आहेत, हे निश्चीत आहे.

या राजकीय वाटचालीत विभागाचे मार्गदर्शक,माजी विरोधी पक्षनेते हणमंत जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली आपला राजकीय वारसा पुढे नेत तो अधिक उज्ज्वल, गतिमान आणि लोकाभिमुख करण्याचा त्यांचा ठाम मानस आहे. अनुभवी नेतृत्व आणि तरुण ऊर्जेचा हा संगम शिवसेनेच्या कार्यपद्धतीचे उत्तम उदाहरण ठरत आहे.

तरुण, तडफदार पण शांत व संयमी स्वभावाचा हा चेहरा आज प्रभाग क्रमांक ६ मधील नागरिकांसाठी आश्वासक नेतृत्व ठरला आहे. प्रशांत जाधवर हे केवळ प्रश्न मांडणारे नाहीत, तर ते सोडविण्यासाठी प्रत्यक्ष कृती करणारे प्रशासक, दिशादर्शक आणि विकासाभिमुख विचारांचे प्रतीक आहेत.

स्वच्छ चैतीनगर ही त्यांची संकल्पना प्रभागाच्या सर्वांगीण स्वच्छतेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरली आहे. कचरा, सांडपाणी,मलनिस्सारण गटारे, समूह विकास यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर तसेच पायाभूत सुविधांवर 'स्वच्छ चैतीनगर' या व्हॉट्सॲप समूहाच्या माध्यमातून तात्काळ उपाययोजना केल्या जात असून, प्रशासन व नागरिक यांच्यातील प्रभावी दुवा म्हणून राजा जाधवर कार्यरत आहेत.

सामाजिक कार्यासोबतच युवकांच्या विकासातही त्यांचा सक्रिय सहभाग आहे. विठ्ठल क्रीडा मंडळाच्या माध्यमातून प्रभागातील युवकांना कबड्डीपटू घडविण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत. खेळातून शिस्त, संघभावना आणि आत्मविश्वास निर्माण करण्यावर त्यांचा ठाम विश्वास आहे.

विशेष म्हणजे, प्रशांत उर्फ राजा जाधवर हे आमच्या ओम कादंबरी को. हौ. सोसायटीचे सभासद आहेत. त्यामुळे ते केवळ उमेदवार नसून, कुटुंबातील हक्काचा माणूस आहेत. त्यांना ठाणे महापालिकेत पाठविणे ही आमच्या समस्त कादंबरीकरांची सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे. म्हणूनच ही निवडणूक आमच्या सोसायटीसाठी केवळ राजकीय प्रक्रिया न राहता, अत्यंत भावनिक आणि तितकीच स्वाभिमानाची लढाई ठरणार आहे.

राजा म्हणजे हमखास कामपूर्ती अशी भावना आज सर्वसामान्य नागरिकांच्या मनात पक्की झाली आहे. आपल्या कार्यालयात कोणतीही अडचण घेऊन आलेला नागरिक निराश होऊन परत जात नाही, हा त्यांचा विश्वासार्ह अनुभव आहे. हाच जनतेचा विश्वास आणि आपल्या माणसांचा भक्कम पाठिंबा घेऊन या समाजसेवकाने पालिकेची निवडणूक स्वतः लढवून जिंकण्याचा निर्धार केला आहे. निवडणूक ही सत्तेसाठी नव्हे, तर सेवेसाठी असते, हे प्रशांत उर्फ राजा जाधवर यांनी आपल्या कृतीतून वारंवार सिद्ध केले आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक ६ साठी हा राजा सिंहासनासाठी नव्हे, तर जनतेच्या सेवेत अधिक जबाबदारीने उतरायला सज्ज झाला आहे, असे म्हणणे निश्चितच अतिशयोक्ती ठरणार नाही.



पत्रकार
श्री. विकास दळवी
ठाणे शहर प्रतिनिधी
मो.९००४८ ९३२९९

# पेरले तेच उगवणार!



भाजपचे तिकीट म्हणजे हमखास विजय, हा समज कार्यकर्त्यांनी करून घेतला, तसा राजकारणात सारे काही पैशाने विकत घेता येते, असा समज दुर्दैवाने राजकीय पक्ष व त्यांच्या नेत्यांनीही करून घेतला आहे. नाराजांच्या उद्रेकातून योग्य धडा घेतला तरच जनाधर टिकू शकेल, हे लक्षात घ्यायला हवे.

महापालिका निवडणुकीत उमेदवारी न मिळाल्याने धाय मोकलून रडणारे इच्छुक, ऊर बडवून घेणाऱ्या महिला, स्वपक्ष व नेत्यांनाही शिव्यांची लाखोली वाहणारे, धरणे-ठिय्या आंदोलन करणारे, रडून-रडून बेशुद्ध झालेली महिला कार्यकर्ता अशी अनेक दृश्ये गेले दोन-तीन दिवस राज्यभरात सर्वदूर दिसली. खरे म्हणजे या रणधुमाळीत दररोज वेगवान, रंजक व अनाकलनीय घडामोडी घडत असल्याने 'कुठे नेऊन ठेवलीय निवडणूक' अशा प्रतिक्रियाही उमटणे साहजिकच. निवडणूक होत असलेली २९ शहरे वेगवेगळी असली तरी राजकीय पक्षांनी प्रत्येक प्रभागात कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या, उमेदवारी देण्याचा 'शब्द' दिला होताच. मग साऱ्यांनाच खुर्ची व सत्तेची स्वप्नं पडू लागल्याने 'उदंड झाले इच्छुक' अशी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होऊन शेवटी ज्याची भीती होती तेच घडले. अनेक ठिकाणी इच्छुकांचा संयम सुटल्याने बाचाबाची, हाणामारी, गोळीबार आणि सोलापूरसारख्या शहरात तर थेट खुनाचाही प्रसंग घडला. रणधुमाळीला गालबोट लागले.

गेल्या तीन-साडेतीन वर्षांतील घडामोडी लक्षात घेता राजकारणाचे अध:पतन झाल्याचा प्रत्यय पावलोपावली येत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत असे अचंबित करणारे, अश्लाघ्य प्रकार घडतीलच, याची खात्री अनेकांना होतीच. निवडणूक लढण्यासाठी आसुसलेल्यांना प्रामुख्याने सत्ताधारी पक्षांची आणि त्यातही खासकरून भारतीय जनता पक्षाचीच उमेदवारी हवी असल्याने अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या तासांपर्यंत या पक्षात 'मेगाभरती' चालूच होती. काही प्रभागांत अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या काही तासांत दाखल झालेल्या उपऱ्यांचेच चक्क पॅनेल बनले. काही करून एकहाती सत्ता वा आसुरी बहुमत मिळविण्यासाठी आटापिटा सुरू असल्याने या पक्षाने शेवटी अपेक्षेप्रमाणे 'मेगागोंधळ' अनुभवला. मग बाहेरून आलेले व स्वकियांनी मिळून पक्षाला ऐन रणधुमाळीत अडचणीत आणले. एरव्ही मूग गिळून बसणाऱ्या पक्षातील निष्ठावंतांनाही कंठ फुटला. त्यांच्या संतापाचा कडेलोट झाला.

भाजपचे तिकीट म्हणजे हमखास विजय, हा समज कार्यकर्त्यांनी करून घेतल्याने या पक्षाची उमेदवारी मिळाली नाही म्हणजे जणू काही सर्वस्व गमावल्यागत कार्यकर्त्यांनी आकांडतांडव केला. त्यामुळे अनेक महापालिकांत माघारीनाट्य चांगलेच रंगले. तिकिटे विकल्याचे आरोपही नेत्यांवर झाले. भाजपचे एकवेळ ठीक. परंतु जेमतेम अस्तित्व उरलेल्या काँग्रेसमध्येसुद्धा पैसे घेऊन उमेदवारी दिल्याचे आरोप होत असतील तर याला काय म्हणावे? तसे प्रत्येक निवडणुकीत माघारी नाट्यादरम्यान असले प्रकार घडत असतातच. या वेळी भाजपमधील पक्षांतर्गत संताप, उद्रेक चव्हाट्यावर आला इतकेच; सोबत 'पार्टी विथ डिफरन्स'चा दावा करणाऱ्या या पक्षातील गटबाजी सार्वजनिक होऊन 'पार्टी विथ डिफरन्सेस' ही नवी ओळख मिळाली! तसे अद्याप प्रचार रणांगणात तोफा धडाडायच्या असल्याने मतदारांना 'खूप काही' बघण्याची तयारी ठेवावी लागणार आहेच. असो.

नव्या वर्षात सिंहस्थ कुंभमेळ्याला सामोरे जाणाऱ्या नाशिकमध्ये महापालिकेच्या १२२ जागांसाठी सुरुवातीला दोन-अडीच हजार इच्छुक होते; परंतु माघारीच्या अखेरच्या दिवशी अर्ज केलेल्यांपैकी ६१२ विक्रमी अर्जदारांनी काढता पाय घेतल्याने निवडणुकीच्या रिंगणात ७२९ जण तेवढे उरले आहेत. तरीसुद्धा एका जागेसाठी जवळपास सहा उमेदवार नशीब आजमावत आहेत. भाजप आणि शिंदे सेनेने हरेक प्रयत्न करूनही या पक्षांतील काही बंडखोरांचे आव्हान कायम राहिल्याने शहरात बहुरंगी आणि बहुढंगी प्रत्यय न यावा तरच नवल! साक्षात मुख्यमंत्र्यांशी बोलणे झाल्यानंतरही भाजपमधील काही बंडोबांनी माघार घेतलीच नाही. संमेलनाच्या व्यासपीठावरून उसंत काढून मुख्यमंत्री सातत्याने नाराजांशी संपर्क साधत होते हे विशेष. काही उमेदवारांनी फोन बंद करून ठेवले, तर कोणी स्वत:ला कोंडून ठेवण्याची क्लृप्ती शोधून लढण्याची खुमखुमी व आपले आव्हान कायम ठेवले. काहींनी माघारीची पुरेपूर किंमत वसूल केली असणारच. उरलेले नाराज किंवा माघार घेतलेले आता अभूतपूर्व उत्साहाने पाडापाडीचे उद्योग करू शकतात. तसे घडल्यास अनेक निकाल फिरू शकतील आणि हे यंदाच्या निवडणुकीचे वैशिष्ट्य ठरेल.

भाजपच्या काही नाराजांनी चक्क शहराध्यक्ष सुनील केदार यांना घेराव घालून त्यांना अपशब्द वापरले. घोषणाबाजी करून त्यांच्यासोबत रेटारेटीचाही प्रयत्न झाला. नंतर केदार यांना बराच वेळ कोंडून ठेवण्यात आले. काही इच्छुकांनी चक्क टीव्ही कॅमेऱ्यांसमोरच गाजरांची भेट देऊन पक्षाला घराचा आहेर दिला. केविलवाण्या चेहऱ्याने नाराजांची समजूत घालण्याचा तोकडा प्रयत्न केदारांनी करून पाहिला; परंतु ऐकतील ते पदाधिकारी कसले? निवडणूक म्हटली, की अशा गोष्टी आल्याच, परंतु एखाद्या शेताचा बांध फोडून सारे शेतच उजाड करणाऱ्या भाजपला मात्र 'जैसी करनी, वैसी भरनी'चा प्रत्यय येणे सुरू झाले आहे. सत्तेच्या जोरावर त्यांनी जसे इतर पक्ष फोडले, त्यांचे नेते, कार्यकर्ते पळविले, तीच वेळ आपल्यावर उद्या येऊ शकते हे आता लक्षात घ्यायला हवे. घडल्या प्रकारांचे चौकशी अहवाल आल्यानंतर तरी पक्षश्रेष्ठींचे डोळे उघडले असतील, अशी आशा आहे.

## ऐक्य

अविरोध निवडणूक
जाणा त्याचे महत्त्व
लोकशाहीने दिलेले
निर्भेळनिरामय सत्व

खुर्ची ही असते गौण
उच्चस्थानी राहे तत्व
खुर्चीत बसणा-यांचे
मोठे असावे कर्तृत्व

डोळस रहावे माणसा
नकोधृतराष्ट्री अंधत्व
उक्तीत कृतीत फरक
वाट्या येणार वंध्यत्व

स्तुतीकरे सोयीनुसार
उफाळून येई कवित्व
सत्ता ओढ काय वर्णू
आकर्षणफिकेगुरुत्व

निस्वार्थस्वच्छ मनाने
जाणावे खरे दायित्व
निदान नको मारेकरी
भले अशक्य साधुत्व


आपलापाट दुज्याला
भले नसूदे हे दातृत्व
अर्धाघास भुकेलेल्या
इतके उमलो मातृत्व

जनसेवा ही ईशसेवा
प्रशासकपहा पितृत्व
निवडणूकसरल्यावर
अबाधित हवे बंधुत्व

निवडावे एक मताने
असेचहवे व्यक्तीमत्व
अबाधितराहो नक्की
लोकशाहीचेअस्तित्व

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# किडनीच्या विकाराने त्रस्त आहात, हे व्हिटामिन्स सुरु करा, झटपट आराम मिळवा



किडनीची समस्या नेहमीच हळूहळू सुरु होते. सुरुवातीला याची लक्षण दिसत नाहीत. अशावेळी लोक सप्लीमेंट्सचा विचार करतात. जे किडनीचे कार्य चांगले होण्यासाठी मदत करेल, सूज कमी करेल आणि किडनीला आरोग्यदायी करेल. मात्र कोणताही सप्लीमेंट्स किडनीचा आजार ठीक करु शकत नाही. योग्य पद्धतीने आणि योग्य प्रमाणात घेतलेले काही पोषक तत्वे ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेसला कमी करणे आणि किडनीच्या कार्याला मदत करु शकतात. NIH आणि नॅशनल किडनी फाऊंडेशन संबंधी झालेल्या अभ्यासही तेच सांगत आहे.

**▶व्हिटामिन्स ठरु शकते उपयोगी...**

टारगेटेड न्यूट्रिशनच्या ताकदीचा विचार करायचा झाला तर काही खास व्हिटामिन्स आणि एंटीऑक्सीडेंट सेल्सला होणारे नुकसान कमी करणे, डिटॉक्स प्रक्रियेसा सपोर्ट करणे आणि किडनीचे टिश्यूला पडणाऱ्या ताणापासून वाचवण्यास सहायक ठरु शकतात. या उपचाराचा पर्याय नाही.परंतू मेडीकल ट्रीटमेंटच्या सोबत हा सपोर्ट सिस्टीम सारखी काम करु शकते. व्हिटामिन्स सी ला एक मजबूत एंटीऑक्सिडेंट मानले जाते. हे किडनीच्या टीश्यूत होणारी सूज आणि ऑक्सीडेटिव्ह डॅमेजला कमी करण्यास मदत करु शकते, जे दीर्घकाळापर्यंत किडनीच्या कार्यक्षमतेला नुकसान पोहचवू शकतात. सुरक्षित प्रमाणात घेतलेले व्हिटामिन्स सी किडनीला मजबूत बनवण्यासाठी सहाय्यक होऊ शकते.

हे इम्युन सिस्टीमला सपोर्ट करते. वारंवार होणाऱ्या इन्फेक्शन उदा. युटीआय किडनीच्या समस्येला आणि बिघडवू शकते. व्हिटामिन्स सी शरीराच्या रोग प्रतिकारक क्षमतेला मजबूत करते. ज्यामुळे इन्फेक्शनचा धोका कमी होऊ शकतो आणि किडनीवर होणारा अतिरिक्त दबाव देखील घटू शकतो. किडनी सातत्याने शरीरातील टॉक्सिन्सला फिल्टर करत रहात असते. त्यामुळे फ्री रेडिकल्सपासून होणारे नुकसान येथे लवकर होऊ शकते. व्हिटामिन्स सी या हानिकारक तत्वांना समाप्त करण्यास मदत करते. ज्यामुळे किडनीवर ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेस कमी होतो. आणि हळूहळू होणाऱ्या हानीचा वेग धीमा होऊ शकतो.

**▶या स्थितीत जपावे...**

किडनी स्टोनच्या प्रकरणातही व्हिटामिन्स सीची भूमिका थोडी संतुलन असणारी आहे. काही लोकांमध्ये मर्यादित प्रमाणात याचे सेवन युरिनमद्ये स्टोन तयार करणाऱ्या तत्वांना कमी करु शकते. परंतू खूप जास्त प्रमाणात व्हिटामिन्स सी घेतल्याने उलट स्टोनचा धोका वाढू शकतो. यामुळे डोस घेतना सावधानता बाळगायला हवी. खास करुन ज्या लोकांमध्ये एडव्हान्स किडनी डिसिज आहे. किंवा ज्यांच्या ऑक्सेलट स्टोन तयार होण्याची प्रवृत्ती आहे. त्यांना व्हिटामिन्स सीच्या हाय डोस पासून सावधी रहायला हवे. कोणत्याही प्रकारचे सप्लीमेंट सुरु करण्याआधी डॉक्टर वा तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा आहे. खास करुन किडनी संबंधी औषधे घेताना ही काळजी घ्यायला हवी आहे.

# आजपासून 'महाराष्ट्राची हास्यजत्रे' चं नवीन सिझन

'कोकणचा कोहीनूर' म्हणून ओळखला जाणारा विनोदवीर ओंकार भोजने 'महाराष्ट्राची हास्यजत्रे'च्या नवीन सिझनमधून दमदार कमबॅक करतोय. महाराष्ट्रभर प्रचंड लोकप्रिय असलेल्या या शोचा नवीन सिझन लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याची तारीख नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील लाखो कुटुंबांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या शोचा नवीन सीझन ५ जानेवारीपासून दर सोमवार आणि मंगळवार रात्री ९ वाजता सोनी मराठी वाहिनीवर प्रसारित होणार आहे. या सिझनचं वैशिष्ट्य ओंकार भोजने ठरणार आहे. कारण काही कारणास्तव त्याने हा शो सोडला होता. आता नव्या सिझनमध्ये त्याचं दमदार परफॉर्मन्स पाहण्यासाठी प्रेक्षक प्रचंड उत्सुक आहेत.

महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाच्या पहिल्या भागापासून हास्यजत्रेला प्रेक्षकांचं प्रेम मिळू लागलं होतं. समीर, प्रसाद, नम्रता, गौरव, वनिता आणि हास्यजत्रेतल्या इतर हास्यवीरांनी प्रेक्षकांना आपल्या विनोदांनी आणि प्रहसनांनी पोट धरून हसवलं होतं. लॉकडाऊनच्या कठीण काळातही हा कार्यक्रम रसिकांचं मनोरंजन करत होता. जवळपास साडेतीन वर्षे प्रेक्षकांचं मनोरंजन केल्यानंतर या कार्यक्रमाने काही काळासाठी ब्रेक घेतला होता.

या सिझनमध्ये नव्या संकल्पनेवर आधारित नवे स्किट्स, नवीन व्यक्तिरेखा आणि खास नवीन ट्विस्ट पहायला मिळणार आहेत. त्यासोबतच प्रेक्षकांच्या मनात घर केलेली मराठमोळी विनोदाची शैली, नवे विषय आणि नव्या प्रहसनासह हा सिझन आणखी भव्य, रंगतदार आणि मनोरंजक ठरेल अशी खात्री व्यक्त केली जात आहे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'ने महाराष्ट्रातील प्रेक्षकांच्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेला आहे. दिवसातील सगळी धावपळ, ताणतणाव विसरून लोक या शोसोबत मनमुराद हसतात. त्यामुळेच नवीन वर्षात शोच्या पुनरागमनाची घोषणा होताच प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आणि आनंदाचं वातावरण आहे. रविवारची हास्यजत्रा झाल्यावर प्रेक्षकांनी चार दिवस हास्यजत्रेची मागणी केली होती. प्रेक्षकांच्या आग्रहास्तव हे विनोदवीर आठवड्यातून पाच दिवस यायला सज्ज झाले होते. परंतु यामुळे कामात तोच-तोचपणा येऊन दबाव निर्माण झाला होता. म्हणूनच काही काळ क्रिएटिव्ह ब्रेकची गरज भासल्याने या कार्यक्रमाने प्रेक्षकांचा निरोप घेतला होता. ऩवीन वर्ष म्हणजे नवीन सुरुवात आणि नवीन उत्साह. याच उत्साहाला सलाम करत 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'चा नवा सिझन प्रेक्षकांसमोर येत आहे. या कार्यक्रमाचा प्रयत्न नेहमीच कुटुंबांना एकत्र आणणं, हास्याने प्रेक्षकांचं मनोरंजन करणं हा आहे. नवीन सिझन प्रेक्षकांना दुप्पट मजा आणि दुप्पट एंटरटेनमेंट देईल, असा विश्वास कलाकारांनी व्यक्त केला आहे. येत्या ५ जानेवारीपासून दर सोमवारी आणि मंगळवार रात्री ९ वाजता 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा कार्यक्रम फक्त सोनी मराठी वाहिनीवर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पद्मभूषण डॉ.अण्णासाहेब हजारे महावक्ता करंडक स्पर्धेचे आयोजन राळेगणसिद्धी येथे १० जानेवारी ला स्पर्धा




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, आडवाटेचं पारनेर आणि नागेश्वर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. अण्णासाहेब हजारे महावक्ता करंडक महावक्ता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून ही स्पर्धा शनिवार, दि.१० जानेवारी २०२६ रोजी हिंद स्वराज ट्रस्ट, राळेगणसिद्धी येथे होणार आहे, अशी माहिती स्पर्धा संयोजक प्रा.तुषार ठुबे, विनोद गोळे व प्रा.संकेत ठाणगे यांनी दिली. ही स्पर्धा तीन गटांमध्ये घेण्यात येणार आहे. इयत्ता ४ थी ते ७ वी या प्राथमिक गटासाठी पारनेर तालुक्यातील शाळांमधील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. या गटासाठी आवडते मज मनापासुनी शाळा, झाडे लावा झाडे जगवा, शेतकरी बाप जगाचा पोशिंदा, सोशल मीडिया व आजचा विद्यार्थी, लहान कुटुंब... खरंच सुखी कुटुंब तसेच डॉ.अण्णासाहेब हजारे यांचे जीवनकार्य हे विषय देण्यात आले आहेत.

इयत्ता ८ वी ते १२ वी या माध्यमिक गटासाठी अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. या गटातील विषयांमध्ये माझी अभिजात मराठी, पुरात अडकलेला शेतकरी राजा, वाचाल तर वाचाल आणि शिकाल तर टिकाल, आता नकोय यंत्र संवाद हवाय हृदय संवाद, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले तसेच डॉ. अण्णासाहेब हजारे यांचे जीवनकार्य यांचा समावेश आहे. महाविद्यालयीन गटासाठी ही राज्यस्तरीय स्पर्धा असून वयोमर्यादा २५ वर्षांपर्यंत ठेवण्यात आली आहे. या गटासाठी परधर्मद्वेष म्हणजे धर्माभिमान?, मला समजलेले पसायदान, मतदार याद्या – लोकशाहीचा गाभा, शेती, निसर्ग आणि अर्थकारण असे विषय असणार आहेत. या स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रा. तुषार ठुबे, विनोद गोळे, प्रा. संकेत ठाणगे,किरण लोंढे, अशोक गायकवाड, सोमनाथ चौधरी, महाबली मिसाळ, वैभव पोटे,स्वाती ठुबे, सचिन गायखे, प्रमोद चेमटे, हरी व्यवहारे, अभिषेक नवले, शाद्धा थोरात, अर्चना पोटघन, सचिन लंके व अनिल नऱ्हे यांनी केले आहे.

## शालेय विद्यार्थ्यांनी अनुभवले पोलीस ठाण्यातील 'शस्त्र आणि शास्त्र'




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०४, नागपूर :** महाराष्ट्र पोलीस दलाच्या वर्धापन दिनानिमित्त (Raising Day) खापरखेडा पोलीस ठाण्यात दिनांक ०२ जानेवारी ते ०८ जानेवारी २०२६ या कालावधीत 'पोलीस रायझिंग डे' सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून खापरखेडा येथील शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पोलीस ठाण्याला भेट दिली. यावेळी पोलिसांनी वापरलेली आधुनिक शस्त्रे, रायफल आणि पोलीस ठाण्यातील कामकाजाची पद्धत जवळून पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली याप्रसंगी पोलीस ठाण्याचे अंतरंग जाणून घेताना विद्यार्थी भारावले. नेहमीच भीतीचे किंवा कुतूहलाचे केंद्र असणाऱ्या पोलीस ठाण्याचे दरवाजे आज विद्यार्थ्यांसाठी आनंदाने उघडले होते. खापरखेडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना खालील बाबींची सविस्तर माहिती देण्यात आली. पोलिसांच्या ताफ्यात असणाऱ्या विविध प्रकारच्या रायफल, पिस्तुल आणि इतर शस्त्रास्त्रांची माहिती देण्यात आली. ही शस्त्रे कशी चालतात आणि स्वसंरक्षणासाठी त्यांचा वापर कसा होतो हे पाहून विद्यार्थी थक्क झाले. यावेळी पोलीस स्टेशन डायरी, एफआयआर नोंदवण्याची प्रक्रिया आणि कायदेशीर कागदपत्रांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले शिवाय गुन्हेगारांना कुठे ठेवले जाते आणि पोलीस तपासाची पद्धत कशी असते याची माहिती देऊन कायद्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. विशेष म्हणजे खापरखेडा पोलीस ठाणे आता शहर पोलीस दलात वर्ग करण्यात आले आहे. या बदलामुळे पोलीस दलाची कार्यक्षमता आणि आधुनिकता वाढली असून, नागरिकांशी संवाद वाढवण्यासाठी असे उपक्रम मैलाचा दगड ठरत आहेत. यावेळी शाळेतील शिक्षक, पोलीस अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> "विद्यार्थ्यांच्या मनात पोलिसांबद्दल असलेली भीती दूर व्हावी आणि त्यांना देशाच्या कायद्याची व सुरक्षेची माहिती मिळावी. हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. भविष्यातील सुजाण नागरिक घडवण्यासाठी पोलीस आणि जनता यांच्यातील हा संवाद आवश्यक आहे."
>
> **– हरिष रुमकर (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खापरखेडा)**

## श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, बुलढाणा :** श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, बुलढाणा येथे दिनांक ०३ जानेवारी २०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य श्री.प्रमोद कावरे, पर्यवेक्षक श्री.राजपूत, विज्ञान विभाग प्रमुख श्री.भोंडे, एच.एस.व्ही.सी. विभाग प्रमुख श्री.वाघ, शिक्षकेतर प्रतिनिधी श्री.मांगे बाबूजी, सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत असलेली कु.श्रद्धा वानखेडे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यावेळी विद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर भाषणे सादर केली. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्री.प्रमोद कावरे यांनी सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया कसा घातला,समाजातील गोर गरीब व उपेक्षित घटकांच्या हक्कासाठी लढा कसा दिला. दगड धोंडे व शेणाचा मारा सहन करूनही वंचित घटकासाठी शिक्षणाचा मार्ग कसा खुला केला. याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.मजगे यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री.बनसोडे यांनी केले. याप्रसंगी कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी, सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## तंत्रज्ञानाच्या युगात भाई लक्ष्मणराव गोळेगावकर यांनी पारंपारिक खेळ जिवंत ठेवले - क्रीडा आधिकारी गीता साखरे




**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०४, पालम (परभणी) :** सध्याचा काळ हा माहिती तंत्रज्ञानाचा असला तरी पारंपरिक गोष्टींना महत्त्व दिले शिवाय कोणालाही यश मिळणार नाही. हे स्पष्ट करणारा आहे.

देशात आणि जगात अनेक आधुनिक खेळांना महत्त्व आले तरी ग्रामीण भागातील पारंपरिक खेळ विद्यार्थ्यांच्या भावनात्मक आणि शारीरिक विकासासाठी महत्त्वाचे आहेत ते जिवंत ठेवण्याचे काम श्री बळीराजा क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रीयरत्न भाई लक्ष्मणराव गोळेगावकर यांनी जिवंत ठेवले याची नोंद महाराष्ट्रातील इतिहासाला घ्यावी लागेल. असे प्रतिपादन परभणी जिल्ह्याच्या क्रीडा अधिकारी गीता साखरे यांनी आज रविवार, दि.०४ जानेवारी २०२६ रोजी केले. त्या तालुक्यातील फरकंडा येथे जयक्रांती माध्यमिक विद्यालयात श्री बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चाळीसाव्या श्री बळीराजा क्रीडा महोत्सवात बक्षीस वितरण करताना प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वर चे अध्यक्ष तथा पालम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तुषार भैया गोळेगावकर हे होते .

यावेळी विचार मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून ओमप्रकाश कवळे, विजयराव पाटील, लक्ष्मणराव कवळे, चित्राताई गोळेगावकर, अक्षय्याताई गोळेगावकर, अपर्णाताई गोळेगावकर, तेजस्विनीताई आरसुळे, उपसरपंच कौशल्याबाई पौळ, चंद्रकांत पौळ, बाबुराव पौळ, नेमाजी जोंधळे सरपंच, गणेशराव पौळ, प्रा.डॉ.हरिष सातपुते, आर.के.क्षीरसागर, देवराव पौळ यांची प्रमुख उपस्थिती होती. सलग तीन दिवसीय बळीराजा क्रीडा महोत्सवच्या माध्यमातून पारंपारिक अस्तंगत होणाऱ्या खेळांचे पुनर्जीवन व्हावे. यासाठी बळीराजा परिवाराच्या माध्यमातून विविध खेळांचे व त्या स्पर्धांचे आयोजन करून अनेक खेळाडूंना व विद्यार्थ्यांना या स्पर्धेत खेळविण्यात आले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य पणाला लावत या खेळांचा आनंद घेतला. यावेळी पुढे बोलताना श्रीमती साखरे म्हणाले की, एखादे ध्येय असल्याशिवाय कुठलीही संस्था किंवा माणूस एखादी गोष्ट ४० वर्षांपासून कायम ठेवत नाही. आणि ती गोष्ट म्हणजेच पारंपरिक खेळांचे जतन करण्यासाठी भाई गोळेगावकर यांनी मागील ४० वर्षांपासून शासनाची कुठलीही मदत न घेता जे कार्य केले आहे ते सर्वांनी नोंद घेण्यासारखे आहे .

यावेळी अध्यक्ष समारोप करताना भाई तुषार भैय्या गोळेगावकर म्हणाले की, भाई लक्ष्मणराव गोळेगावकर म्हणजेच नाना यांच्या प्रेरणेतून आम्ही पुढील वाटचाल करीत आहोत. ग्रामीण भागातील विद्यार्थी शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी ज्या ज्या गोष्टींचा आग्रह नानांनी धरला होता तीच कास आम्ही पुढे धरून चालणार आहोत. यावेळी बळीराजा परिवारातील विविध शाळांमधील विजेत्या आणि उपविजेत्या स्पर्धा आणि संघांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक दिगंबर दुधाटे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंगराव सुपेकर व बबन साळेगावकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वर चे प्रशासकीय अधिकारी गिरीश सोळंके, प्राचार्य डॉ.आत्माराम आरसुळे, अभय कुमार कदम यांच्यासह संस्थेतील मुख्याध्यापक आणि क्रीडा शिक्षकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला परिसरातील हजारो विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

## अहिल्यानगरमध्ये कांदा शेतीचा वेग वाढला; लाल कांदा काढणी व गावरान कांद्याची लागवड जोमात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, अहिल्यानगर :** जिल्ह्यात सध्या लाल कांदा काढणी आणि उन्हाळी गावरान कांदा लागवडीचे काम वेगात सुरू आहे. विशेषतः पारनेर तालुक्यात कांदा हे तीनही हंगामांतील महत्त्वाचे पीक असल्याने शेतशिवारात शेतकऱ्यांची धावपळ वाढली आहे. एकाचवेळी मोठ्या प्रमाणावर काढणी सुरू झाल्याने मात्र मजुरांची कमतरता आणि वाढते दर यामुळे शेतकऱ्यांना माळशेज घाटाखालील गावातील मजुरांचा आधार घ्यावा लागत आहे. रोजंदारीऐवजी ठेका पद्धतीकडे वळताना दिसत आहेत. पारनेर तालुका हा कांदा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून येथे खरीप, रब्बी व उन्हाळी – तिन्ही हंगामांत कांदा घेतला जातो. लागवड, काढणी, साठवण अशा सर्व टप्प्यांत मोठ्या प्रमाणावर मजुरांवर अवलंबून राहावे लागते. सध्या थंडीच्या पार्श्वभूमीवर कामाच्या वेळा बदलून सकाळी व दुपारी मर्यादित वेळेत कामे केली जात आहेत.

सध्याची परिस्थिती पाहता रोजंदारी मजुरी साधारण ४०० ते ५०० रुपये प्रतिदिन आहे. थंडीमुळे कामाचे तास कमी झाल्याने खर्चाच्या तुलनेत काम पूर्ण होत नाही. त्यामुळे रोजंदारी पद्धत अनेक शेतकऱ्यांना परवडत नसल्याचे दिसून येते. याच कारणामुळे शेतकरी ठेका पद्धतीला प्राधान्य देत आहेत. ठेका पद्धतीचा वाढता वापर कांदा लागवड किंवा काढणीसाठी सध्या ठेकेदार एकरी सुमारे बार ते पंधरा हजार पर्यंत दर घेत आहेत. ठेका पद्धतीत आठवड्याचे काम ३ ते ४ दिवसांत पूर्ण होते. वेळेची बचत आणि काम पूर्ण होण्याची खात्री मिळते. अनेक शेतकऱ्यांच्या मते, खर्च जरी जास्त वाटला तरी वेळ आणि नियोजनाच्या दृष्टीने ठेका फायदेशीर ठरत आहे. मागील महिन्यात झालेल्या पावसाचा परिणाम कांदा शेतीवर झाला आहे. कांद्याची रोपे खराब झाली. अनेक शेतकऱ्यांना नव्याने रोपे तयार करावी लागली आहेत. रोपे मिळवण्यासाठी सध्या मोठी धावपळ सुरू आहे. यामुळे लागवडीचा खर्च आणि मेहनत दोन्ही वाढले आहेत. वीजपुरवठ्याच्या वेळापत्रकानुसार पाणी देणे, मजुरांचे वेळापत्रक जुळवणे, लागवड व काढणीची कामे समन्वयाने करणे, या सर्व बाबींमध्ये तारेवरची कसरत करावी लागत असून उत्पादन खर्चात मोठी वाढ झाल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत.

## मंद्रूप हद्दीतील पोलीस पाटलांचे कार्य कौतुकास्पद - पोलीस अधिक्षक कुलकर्णी

### जिल्ह्यातील २४१ पोलीस पाटील यांचा सन्मान

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०४, सोलापूर :** जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांपैकी मंद्रूप पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटलांचा ड्रेस कोड अन्य पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटलांना करण्याचा प्रयत्न चालू असून एकंदरीत मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटलांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज (मंद्रुप) येथे सोलापूर जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस अधीक्षक कुलकर्णी बोलत होते. पुणे येथील संस्थापक अध्यक्ष जय हिंद एज्युकेशनचे अब्दुलकादर बडेजागीरदार यांनी पोलीस पाटलांना आपल्या गावातील समस्या सोडवण्याबरोबरच अतिवृष्टी महापूर कोरोना यासारख्या संकटांना सामोरे जाऊन कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नेहमी सतर्क राहावे लागते. यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा. या उद्देशाने औज येथील अब्दुलकादर बडेजागीरदार त्यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील पोलीस पाटलांचा सन्मान करण्याची संकल्पना मांडली होती. यावेळी पोलीस अधीक्षक कुलकर्णी बोलत होते. सर्व पोलीस पाटलांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रारंभी सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपविभागीय अधिकारी सोलापूर ग्रामीण संकेत देवळेकर, प्रशिक्षणार्थी सहाय्यक पोलीस राहुल आत्राम, मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार, मंद्रुप पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राजू डांगे, मंद्रूप पोलीस ठाण्याचे गोपनीय विभागाचे सागर चव्हाण, अब्दुलकादर बडेजागीरदार यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.



याप्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांनीही पोलीस पाटलांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी सैपन बेगडे जिल्हा कार्याध्यक्ष, शिवानंद फुलारी जिल्हा अध्यक्ष, विजय गावडे – दक्षिण सोलापूर अध्यक्ष, संतोष असबे –उत्तर सोलापूर अध्यक्ष, धर्मराव कोळी, नागनाथ उंबरजे, तायाण्णा काळे, अंकुश खरात– अध्यक्ष करमाळा, सारीका खोतर, निसार अत्तार, साक्षी कोळी महिला जिल्हाध्यक्षा, महादेव बिराजदार, आनंद रायबान– मंगळवेढा अध्यक्ष, अश्विनी राठोड, प्यारन मुल्ला आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सदाशिव होनमाने यांनी केले.

## निरा - बारामती रस्त्यावर पणदारे नजीक एस.टी व दुचाकी वाहनांचा अपघात

### अपघातात दुचाकीवरील दोन तरुणांचा मृत्यू

**अक्षराज : शरद भगत**

**दि.०४, बारामती :** कोर्हाळे बुद्रुक –बारामती – निरा या रस्त्यावर दुचाकी व एस टी चा अपघात झाला. या अपघातात दुचाकी वरील तरुणांचा जागीच मृत्यू झाला. मृत तरुणांची नावे विकास कुंडलिक कांबळे, सुरेश रामेश्वर सोनवार (रा.मालेगाव, ता.गेवराई, जि.बीड) असे आहे. हे तरुण गेवराई तालुक्यातील मालेगाव येथून बारामती तालुक्यात उस तोड करायला आले होते. बारामती आगाराची एस.टी बस (एम एच ४२ बीटी ४४२१)निरा बाजूकडून बारामती कडे चालली होती. तर मयत तरुण डिस्कव्हर कंपनीची दुचाकी (एम एच १७ ए यु ०१६८) वरुन बारामती कडून निरा बाजू कडे चालली होती. कोर्हाळे बुद्रुक – पणदारे दरम्यान खामगळवाडी पाटी नजिक हॉटेल मयुरी समोर हा अपघात घडला. दुचाकी वरील मयत तरुण एस टी बसच्या चालक बाजूच्या चाकाला धडकले .एस टी चालकाने त्यांना चुकवण्याचा प्रयत्न केला मात्र रस्त्याचे काम चालू असल्याने चालकाला एसटी बस रस्त्याखाली नेता आली नाही. सदर अपघाताची माहीती मिळताच वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनचे पोलीस पथक अपघाताच्या ठिकाणी दाखल झाले .त्यानीं जखमींना बारामती येथील शासकीय रुग्णालयात पाठवले. मात्र अपघातात मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला होता. गंभीर जखमी असलेल्या दुसर्या तरुणाला तात्काळ पुणे येथील ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र दवाखान्यात उपचार घेण्या पुर्वीच त्याचा ही मृत्यू झाला होता.

# पनवेलमध्ये सायकल रॅलीद्वारे मतदान करण्याचे आवाहन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, पनवेल :** येत्या १५ जानेवारीला पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाविषयी जनजागृती निमर्ण करण्यासाठी पनवेल शहरात भव्य सायकल रॅलीचे आयोजन आज करण्यात आले. या सायकल रॅलीच्या माध्यमातून सुमारे २५० सायकलस्वारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदानाचे महत्त्व सांगणारा संदेश दिला.



आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने महापालिकेच्या वतीने निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृतीसाठी स्वीप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आज सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते व जनसंपर्क अधिकारी नितीन साके उपस्थित होते. यावेळी उपायुक्त डॉ.विधाते यांनी लोकशाहीमधील निवडणुकीचे महत्त्व सांगून, उपस्थित सर्वांना मतदानाची शपथ दिली.

या सायकल रॅलीची सुरूवात वडाळे तलावापासून झाली पुढे खांदा कॉलनी– अदई चौक– न्यू पनवेल पूल– एस.टी. स्थानक– शिवाजी पुतळा– पनवेल महानगरपालिका मुख्यालय व पुन्हा शेवटी वडाळे तलाव अशा मार्गाने ही रॅली झाली.

मतदान जनजागृती उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या या सायकल रॅली मध्ये रोड स्पिन वॉरियर्स, आरसीजी न्यू पनवेल, पीसीसी पनवेल, पेडल वॉरियर्स, पनवेल रायडर्स, नॅव्ही, डीसीसी बेलापूर, अनुभव सायकल क्लब, वंडरर्स व निसर्ग मित्र अशा विविध सायकल क्लब्स व सामाजिक संस्थांचा सक्रिय सहभाग नोंदविला. सायकल रॅली यशस्वी पुर्ण केल्याबद्दल सर्व सहभागी सायकलस्वारांना मेडल, प्रमाणपत्र व सायकल क्लबना स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सायकल मोर्चा दरम्यान सायकलस्वारांनी नागरिकांशी संवाद साधत मतदानाचे महत्त्व पटवून दिले. लोकशाही सक्षम करण्यासाठी प्रत्येक मत मौल्यवान असून जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

**मतदान जनजागृतीपर पोवाड्याचे आयोजन**

लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये मतदारांच्या भूमिकेचे महत्त्व सांगणारा पोवाडा यावेळी आयोजित करण्यात आला. पनवेल महानगर पालिकेकडून पनवेल महानगरपालिका परिसरात विविध ठिकाणी पोवाड्यांचे आयोजन केले आहे. यास सायकल स्वारांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

# शिरसी गावात राबविला जाणार 'अभ्यासाचा भोंगा' नाविन्यपूर्ण उपक्रम

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त संकल्प

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०४, पंढरपूर :** शिरसी (ता.मंगळवेढा) येथे ०३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले (बालिकादिन) जयंतीचे औचित्य साधून शिरसी गावचे सरपंच बाबासाहेब सुखदेव कसबे यांच्या संकल्पनेतून गावातील, प्राथमिक माध्यमिक, उच्च माध्यमिक तसेच कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा शिरसी येथील जि.प.प्रा. शाळा पटांगणात आयोजित केली होती. या सभेस गावातील ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत शिरसी गावात 'अभ्यासाचा भोंगा' हा नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वीपणे राबविण्याचे ठरवण्यात आले. शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वाढत्या मोबाईल वापरामुळे, पालकांचा टीव्ही व मोबाईलचा वाढता वापर, सोशल मीडियामध्ये अडकलेली तरुणाई यामुळे अभ्यासाची शिस्त आणि संस्कार कमी होत असल्याचे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना अभ्यासाची सवय आणि शिस्त लावण्यासाठी संपूर्ण शिरसी गाव एकवटले आहे. या उपक्रमानुसार सायंकाळी ७ ते ९ अशी अभ्यासाची वेळ ठरविण्यात आली. दररोज सायंकाळी



७ वाजता अभ्यासाचा भोंगा वाजणार, भोंगा वाजला की गावातील विद्यार्थी अभ्यासाला बसणार आहेत. तसेच गावातील सर्व घरातील सायंकाळी ७ ते ९ या दरम्यान टीव्ही, मोबाईल बंद ठेवण्यात येणार आहेत. साधारण २ तासांच्या वेळेत विद्यार्थी अभ्यासाला बसतील व त्यांचे पालक त्यांच्यावर लक्ष ठेवतील. यामुळे दररोज २ तास गावातील विद्यार्थ्यांचा विनाअडथळा अभ्यास होणार आहे. या सभेस गावचे सरपंच बाबासाहेब कसबे, उपसरपंच शहाजी औताडे, माजी सरपंच बाबासाहेब गायकवाड, ग्रामविकास अधिकारी राखी जाधव, ग्रामपंचायत सदस्य, जि.प.प्रा. शाळा शिरसीतील शिक्षक, श्री वेताळ विद्यामंदिरचे शिक्षक तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अत्याधुनिक, शेती अवजारे, किटकनाशके व खते योग्य दरात शेतकऱ्यांना देऊ - ॲड. जानुगडे

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०४, पाटण (सातारा) :** आजमितीस शेतीत काम करताना मजुरांची कमतरता जाणवते. त्यामुळे शेतीला आधुनिकतेची जोड देणे फार गरजेचे आहे. मातीशी नातं, यंत्राची साथ, शेतीत आणुया नवी बात या उक्तीप्रमाणे बदलत्या वातावरणाचा शेतीवर फरक पडून किडीचे प्रमाण वाढत असल्याने नवनवीन दर्जेदार नामांकीत कंपनीची किटकनाशके, खते, बियाणे, अद्यावत यंत्रे शेतकरी वर्गाला उपलब्ध करून उत्पादनात वाढ करून देणे व शेतीविषयक योग्य सल्ला देण्याचे काम खरेदी–विक्री संघातील कर्मचारी यांच्यामार्फत निश्चितच केले जाईल, असे प्रतिपादन पाटण तालुका खरेदी–विक्री संघाचे चेअरमन ॲड. अविनाश जानुगडे यांनी केले.

माजी सार्वजनिक बांधकाम व पर्यटन मंत्री श्रीमंत विक्रमसिंह पाटणकर यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्ताने तालुक्यातील आधुनिक शेतकरी यांच्या आग्रहास्तव पाटण येथील अत्याधुनिक शेती अवजारे व किटकनाशके विभागाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यादिवशी कार्यलक्षी संचालक श्रीमंत अमरसिंह पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पाटण तालुका सहकारी खरेदी–विक्री संघ लि. च्या शाखा पाटण, चाफळ, तारळे, मोरगिरी, गुढे, ढेबेवाडी येथील शाखांचे उद्घाटन करण्यात आले.

मार्केटयार्ड पाटण येथील शाखेचे संघाचे चेअरमन ॲड. अविनाश जानुगडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी संचालक हिंदूराव शिर्के, किसन डिगे, कार्यकारी संचालक रणजित पाटणकर, महादेव भोसले, चंद्रकांत शिर्के, शंकर यादव, शंकर मोरे, जयवंत सुर्वे, सुनील चौधरी, ॲड.ए.पी.पाटील, माटेकर, हिंदूराव सुतार आदी व कर्मचारी अरुण सूर्यवंशी, अशपाक शेख, विकास जानुगडे, कॅशिअर गणेश शिंदे, अकाऊंटट पंढरीनाथ चोपदार, आदित्य गुरव उपस्थित होते. चाफळ येथील शाखेचे संघाचे संचालक संजय पाटील व हनमंत माने, रामचंद्र झोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी शंकर पडवळ, काशिनाथ मोरे, शिवाजी पाटील, विनोद साळुंखे सुधाकर वेल्हाळ, चंद्रकांत देशमुख आदी व कर्मचारी निरीक्षक आनंदा चव्हाण, शाखाप्रमुख प्रकाश माने, शामल भोईटे उपस्थित होते.

तारळे येथील शाखेचे संघाचे व्हाईस चेअरमन महेंद्र मगर, संचालक, शशिकांत पाटील, भानुदास सावंत, बाळासाहेब राजेमहाडीक, प्रकाश पाटील, अभिजित पाटील, हणमंतराव खबाले, लहूराज कदम, सागर माळी, नवनाथ जाधव, कुमार क्षीरसागर, आदी व कर्मचारी शाखाप्रमुख विजय चव्हाण, पूजा पाटणकर, संजय कांबळे उपस्थित होते. गुढे येथील शाखेचे संघाचे संचालक सुरेश डुबल, अमर पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी अरविंद शिवे, बालासाहेब



बागल, तानाजी शिवे, तेजस पाटील, अजित शिवे, अशोक शिवे, संदीप बागल आदी व कर्मचारी निरीक्षक सचिन जानुगडे, शाखाप्रमुख अभिषेक शिवे उपस्थित होते.

ढेबेवाडी येथील शाखेचे संघाचे संचालक प्रमोद देसाई, प्रतापराव काळे व आत्माराम कदम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी रामचंद्र देशमुख, राजेंद्र देशमुख, राहूल देशमुख, शशिकांत जानुगडे, अमर जानुगडे, अभिजित जानुगडे, भरत जानुगडे आदी व कर्मचारी शाखा प्रमुख समाधान जानुगडे, नितीन कदम उपस्थित होते. खरेदी विक्री संघाचे प्र.कार्यकारी संचालक रणजित पाटणकर यांनी स्वागत केले. सचिन जानुगडे यांनी आभार मानले. कार्यक्रमास पाटण तालुका खरेदी विक्री संघाचे पदाधिकारी, संचालक, शेतकरी, ग्रामस्थ, मान्यवर उपस्थित होते.

# बल्लारपुरात पार पडला राष्ट्रसंत पुण्यतिथी महोत्सव

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, बल्लारपूर (चंद्रपूर) :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगेबाबा यांनी भजन व कीर्तनातून समाज प्रबोधन केले. समाजातील अनिष्ट रूढीवर प्रहार केला. समाजाची जडणघडण योग्य दिशेने व्हावी, म्हणून जागृती केली. स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी मोठे योगदान दिले. खऱ्या अर्थाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी 'ग्रामगीता' ग्रंथाच्या माध्यमातून समाजोन्नतीचे प्रभावी दर्शन घडविले, असे प्रतिपादन चंद्रपूर जिल्हा गुरुदेव सेवा मंडळाचे सेवाधिकारी ॲड.दत्ता हजारे यांनी रविवार, दिनांक ०४ जानेवारी २०२६ रोजी बल्लारपूर येथे सर्व संत स्मृती मानवता दिन व कार्यकर्त्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमात केले. बल्लारपूर तालुका अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने स्थानिक विश्वकर्मा भवन, सार्वजनिक हनुमान मंदिर समोर, विवेकानंद वार्ड येथे दिनांक ०३ जानेवारी व रविवार, दिनांक ०४ जानेवारी २०२६ रोजी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगेबाबा महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सव आयोजित करण्यात आला. स्व.अवधूत नागोसे यांच्या स्मृती प्रित्यर्थ पार पडलेल्या कार्यकर्ता सत्कार समारंभात ॲड.दत्ता हजारे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष डॉ.अल्का वाढई होत्या. प्रमुख अतिथी म्हणून ॲड.दत्ता हजारे, नवनिर्वाचित नगरसेवक देवेंद्र आर्य, डॉ. अनिल वाढई, ॲड.पवन मेश्राम, शिल्पा चुटे, मोना धानोरकर, मनोज बेले, ढोकेताई, गुरूकुंज मोझरी येथील कीर्तनकार आकाश ताविडे महाराज, चंद्रपूर जिल्हा गुरुदेव सेवा मंडळाचे सचिव दादाजी नंदनवार, राजुरा तालुक्यातील सेवाधिकारी मोहनदास मेश्राम, अनुराधा हजारे यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांचा ग्रामगीता, पुष्पगुच्छ, शाल प्रदान करून अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे तालुका सेवाधिकारी भास्कर डांगे, अरुणा डांगे, महेंद्र कोडापे, ओंकार कलसारे आदी पदाधिकाऱ्यांनी भावपूर्ण सत्कार केला. तत्पूर्वी येथील गुरुदेव सेवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व गुरुदेव भक्तांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगेबाबा यांच्या तैलचित्र प्रतिमेसह पालखी मिरवणूक भजन मंडळाच्या सहकार्याने व आकर्षक सजावट करून काढण्यात आली.



दरम्यान ठिकठिकाणी पालखी मिरवणूकीचे गुरुदेव भक्तांनी औक्षण केले. भजन संमेलन दरम्यान तालुक्यातील २७ भजन मंडळांनी सहभाग घेत, राष्ट्रसंतांच्या विचारावर भजनाचे सादरीकरण करून गुरुदेव भक्तांचे प्रबोधन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे तालुका सेवाधिकारी भास्कर डांगे यांनी करून गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्याचा आढावा सादर केला. संचालन प्रा.डॉ.श्रावण बानासुरे यांनी केले. आभार गुरुदेव सेवा मंडळाच्या महिला प्रमुख अरुणा डांगे यांनी मानले. राष्ट्रसंत पुण्यतिथी महोत्सवाच्या यशस्वी करण्यासाठी गंगाराम धोटे, श्रीराम वर्हाडे, दीपक मेश्राम, भैय्याजी त्रिंबके, संतोष देशकर, मनोहर राठोड, रामभाऊ पेटकर, गुणवंत सिडाम, विनोद कुडे, श्यामसुंदर निमसटकर, दत्ता अक्कलवार आदी गुरुदेव भक्तांचे सहकार्य मिळाले.

# थोडक्यात

## गुणदर्शन स्पर्धेत मांडवे खुर्द शाळेचे नेत्रदीपक यश

### यशाची परंपरा सलग तिसऱ्या वर्षी कायम

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील मांडवे खुर्द येथील जि.प. प्राथमिक शाळेने तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत उल्लेखनीय नेत्रदीपक यश संपादन करून आपली शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या वतीने दरवर्षी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धांमध्ये तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत जि.प. प्राथमिक शाळा मांडवे खुर्दचे विद्यार्थी ही उत्साहाने सहभागी झाले होते. त्यामध्ये इयत्ता तिसरीतील गणेश सचिन आहेर याने बालगटातून तृतीय क्रमांक, इयत्ता सहावीतील काव्या रामदास जाधव हिने किशोर गटातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. काव्या जाधव हिची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून शाळेसाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे.

या यशाबद्दल कलश सीडस, जालना कंपनीचे अधिकारी दिनेश सारस्वत, श्रीपाल केंद्रे व सागर वाळुंज यांनी शाळेला भेट देऊन यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. विद्यार्थ्यांचे घवघवीत यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री.लाळगे, विस्तार अधिकारी कांतीलाल ढवळे, टाकळी बिटचे विस्तार अधिकारी गवळी, केंद्रप्रमुख श्री. आंधळे, सरपंच कमलताई गागरे, उपसरपंच मनीषा जाधव, माजी सरपंच सोमनाथशेठ आहेर तसेच गौतम बागुल, रेवणनाथ गागरे, जगदीश पाटील गागरे मंदाकिनी जाधव, पूजा गागरे, सागर पवार, मंगेश गागरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यशवंत जाधव व ग्रामस्थांनी अभिनंदन केले. या यशामागे विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरत असून शाळेची गुणात्मक परंपरा यामुळे अधिक बळकट होत आहे.

## शंकरराव चव्हाण विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी


**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.०४, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खापरखेडा येथे स्त्री शिक्षणाच्या जननी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दिनांक ०३ जानेवारी २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमात सावित्रीबाईंच्या कार्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वीणा पांडे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून व दीप प्रज्वलन करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी सावित्रीबाईंच्या संघर्षाची आणि कार्याची महती सांगणाऱ्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी परिधान केलेली महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा या माध्यमातून विद्यार्थ्यांनी त्या काळातील समाजसुधारकांच्या आठवणींना उजाळा दिला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या या कल्पकतेचे भरभरून कौतुक केले. मुख्याध्यापिका वीणा पांडे यांनी आपल्या भाषणातून सावित्रीबाईंच्या जिवनावर विस्तृत प्रकाश टाकला त्या म्हणाल्या की, आजच्या स्त्रिया ज्या शिखरावर आहेत त्याचा पाया सावित्रीबाईंनी रचला आहे. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षणाची ज्योत तेवती ठेवली तोच वारसा आपल्याला पुढे न्यायचा आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुष्पा बढिये यांनी केले तर संचालन सुरेखा चिखले व आभार नीरज मिश्रा यांनी मानले. या सोहळ्याला वरिष्ठ शिक्षक गणेश चिखले, नरेंद्र बुटोलिया, चंद्रकांत मोहड, प्रमोद इंगळे, दिलदार रामटेके, अनिल भास्कर, नीरज मिश्रा, गीता जालंदर, मनीषा नखाते, जिजा जैन यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## सायन किल्ल्यात सावित्रीबाईंचा 'जन्मदिन' साजरा

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०३, मुंबई :** दरवर्षी ०३ जानेवारी हा सावित्रीबाई फुलेंचा जन्मदिवस राज्यात साजरा केला जातो. राष्ट्र सेवा दलाच्या वतीने सायन किल्ला येथे महिला आणि पुरुष एकत्र येऊन मोठ्या ऊत्साहात यात सहभागी झाले होते. सायन येथील महानगर पालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. सायन किल्ल्यावर रोज येणारे लाफ्टर, सिंगर क्लबचे मेंबर्स यांनी सहभाग तर घेतलाचं पण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मदत केली. अनिल गायकवाड यांनी स्पिकरची मोफत सोय ऊपलब्ध करून दिली. शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी यावेळी समयोचित भाषणे केली. कार्यक्रमासाठी छात्र भारती महाराष्ट्र अध्यक्ष कुमार रोहित ढाले आणि सचिन काकड, निलेश झेंडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत म्हात्रे यांचा विशेष पुढाकार होता. सर्वांचे आभार राष्ट्र सेवा दलाच्या वतीने चंद्रकांत म्हात्रे यांनी मानले.

## माणूसकी फॉउंडेशन तर्फे माता सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**




**दि.०३, मिरा भाईंदर :** माणूसकी फॉउंडेशनच्या महिला पदाधिकाऱ्यांनी दिनांक ०३ जानेवारी २०२६ रोजी रजनी विवाह कार्यालय, नालासोपारा पश्चिम येथे माता सावित्रीबाई फुले जयंती साजरी केली. या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या रामेश्वरी शिंदे यांनी माता सावित्रीबाई फुलेंच्या विचार आणि कार्याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष रजनीताई प्रकाश गडा होते आणि सूत्रसंचालन ज्योती तांबे यांनी केले व महिलांना सांगितले खरी शिक्षणाची देवी माता सावित्रीबाई फुले या आहे. माता सावित्रीबाई फुले जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या आदर्शांचे अनुसरण वर त्यांच्या त्यागाचे स्मरण करुन येणाऱ्या पिढीतील मुलींना माता सावित्रीबाई चे कार्य कळावे. त्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील.